# अल्फ्रेड ज़ेकटर - पुस्तक प्रेमी


मैकी पामिन्तुआन

मराठी : अश्विनी बर्वे




अल्फ्रेड ज़ेक्टरला फक्त एकाच गोष्टीने आनंद व्हायचा, आणि ती म्हणजे पुस्तकं जमा करणे. मग तो आपल्या कामावर निघत असे आणि शहरातले शेवटचे पुस्तक सुद्धा जमा करत असे. डोंगरावर त्याचे घर उभे होते, ते लहानमोठ्या पुस्तकांनी खचाखच भरलेले होते. पण इतर शहरवासीयांकडे वाचण्यासाठी काहीच – एक पुस्तक सुद्धा उरत नसे! शेवटी अल्फ्रेड ज़ेक्टरला पुस्तकाचा खरा आनंद समजतो.

# अल्फ्रेड ज़ेक्टर - पुस्तक प्रेमी

मैकी पामिन्तुआन





अल्फ्रेड ज़ेक्टर एक पुस्तक प्रेमी होता.

त्याच्या गरम, जुन्या घरातल्या प्रत्येक मांडणीत आणि कपाटात त्याच्या प्रिय पुस्तकांची रांग लागलेली होती.





लहानपणी अल्फ्रेडची फक्त एकच इच्छा होती की कोणीतरी त्याच्यावर प्रेम करावे. पण प्रत्येक वेळी जेव्हा त्याने प्रयत्न केला तेव्हा उलटंच झालं. तो एकटा आणि लाजाळू झाला, हुशार आणि स्वप्नं बघणारा झाला. तेव्हा त्याच्या लक्षात आले की पुस्तकांमध्ये त्याला आनंद मिळतो.



समय उड़ता गया, किताबों का ढेर बढ़ता गया,
उसके घर का हर शेल्फ किताबों से लद गया.
जैसे-जैसे अल्फ्रेड बड़ा हुआ,
उसका पुस्तक संग्रह बढ़ता गया.



अल्फ्रेडची कपाटं वस्तूंनी नाहीतर कादंबऱ्यानी भरलेली होती.



त्याने अक्वेरियम मध्ये ठेवला होता माशांचा विश्वकोश!!

त्याला सुरुवातीला वाटलं की तो फक्त एका पुस्तकाने खुश होईल. पण मग दोन पुस्तकं आली, मग तीन आणि मग चार!

अल्फ्रेडने निरीक्षण केलं की पुस्तकांचा ढीग आता पडणार आहे.

"एवढे पुरेस नाहीत," तो म्हणाला.

"माझ्याजवळ सर्व लोकांची पुस्तकं असायला हवी!"





डोंगरावरचे त्याचे घर लवकरच पुस्तकांनी खचाखच भरून गेले.
पण अल्फ्रेडला स्वतःचे स्वप्नं पूर्ण करायचे होते,
आणि तो त्याच्या खूप जवळ होता. त्याने सगळे शहर
पिंजून काढले पायी चालत आणि सायकलवरून.
त्याने खडक उलटेपालटे केले आणि लोकांचे दरवाजे वाजवले.



शेवटी त्याच्या शोधाचा शेवट जवळ आला.
त्याचे हात थरथरू लागले, त्याच्या डोळ्यात पाणी आले.
शेवटचे पुस्तक एका स्मार्ट मुलाजवळ होते.
“तुझ्या चमकदार लाल सायकलच्या बदल्यात
मी तुला हे पुस्तक देईन.”



शहर आता रिकामे झाले होते, सगळी पुस्तके,
मोठी आणि छोटी अल्फ्रेड ज़ेक्टरच्या के
पुस्तकालयात जमा झाली होती.
अल्फ्रेड ने ती सगळी एकत्र केली होती.



घराचा कोपरा-कोपरा, घराचा प्रत्येक भाग,
प्रत्येक कपाट, प्रत्येक मांडणी पुस्तकांनी
खच्चून भरली होती..





तसंतर
अल्फ्रेड ला आनंद व्हायला हवा.
त्याचं स्वप्नं खरं झालं होतं.
पण त्याला काहीतरी गडबड वाटली.
“आता मी काय करू?”

टिक.......

टिक....... टिक .......



. . भिंतीवरचे घड्याळ एकसारखे टिक-टिक करत होते.
“ बिलकुल ठीक आहे!" अल्फ्रेड म्हणाला. “आता मी पुस्तकं वाचायला हवी.”



दिवस गेले, आठवडे गेले, महिने गेले, वर्षे गेली.
अल्फ्रेड ने डॉ. सेउस ते शेक्सपियर पर्यंत
सगळं वाचून काढलं. या दरम्यान,



... पुस्तकांशिवाय लोकांचे जीवन
नीरस, उबग आणणारे आणि पोकळ
झाले. त्यांचे बोलणे विचित्र आणि
झोपण्याची वेळ उबग आणणारी झाली.





आता अशी अनेक मुलं होती ज्यांना
कोणी एखादे पुस्तक वाचून दाखवले नव्हते.

मग एक दुर्भाग्यपूर्ण दिवस,
अल्फ्रेड ने शेवटचे पुस्तकपण वाचून काढले, जसे ते संपले,
त्याच्या मनात अनेक विचार येवू लागले.
थकलेल्या अल्फ्रेडने चारी बाजूला नीट बघितलं.
पुस्तकांनी जेव्हापासून त्याच्या घराचा दरवाजा बंद झाला होता
तेव्हापासून त्याला घराच्या बाहेर पडता आले नव्हते.





जो आनंद त्याला झाला होता,तो आता एका दुःखात बदलला होता. ज्या पुस्तकांवर त्याचे अथांग प्रेम होते,त्यांच्यामुळे त्याचं थडगं झालं होतं.

अल्फ्रेडला खूप अस्वस्थ वाटत होतं.
“आता पुढे काय?” तो ओरडला.
“अजूनही काहीतरी गड़बड़ आहे!
ती काय आहे?” त्याने खोल श्वास घेतला.





अल्फ्रेड उठाला आणि हळूहळू चिमणीवर चढला.
तो आपल्या झोपडीच्या दगडाच्या छतावर आला.
तो छतावर जावून बिलकुल शांत बसला...
तेव्हा एक गंजलेली लाल सायकल डोंगरावर आली.





त्या पुस्तकांनी अल्फ्रेडला बरेच स्मार्ट केले होते.
त्याच्या डोक्यात विचार आले आणि त्याच्या हृदयात पसरले.
“आता मला खरं कळलं आहे!”
अल्फ्रेड छतावरून ओरडला.
"क्षमा कर, भावा!
बघ तुझ्यासाठी एक भेट आहे! ती घे.”
अल्फ्रेड थोडासा दुःखी झाला, पण आता त्याला स्वतःला
पक्ष्यासारखे मुक्त वाटू लागले. “आणि जिथून हे पुस्तक आले आहे,
तिथं अजून अजून आहेत! जा आणि हा संदेश पसरव.!”



अल्फ्रेडने पुस्तकं वाटली
तरुणामध्ये आणि म्हाताऱ्यामध्ये
जसजसे लोकांनी कथा वाचल्या आणि ऐकवल्या
अल्फ्रेड  हसला आणि आनंदला..




एकदा परत पूर्ण शहरात
लोकांनी पुस्तके वाचली.
बेकरीत, बसमध्ये, झाडावर
आणि उलटे लटकून सुद्धा.




आपल्या मित्रांनी घेरलेल्या
अल्फ्रेड ज़ेक्टरने घोषणा केली,
“सगळ्यात चांगले पुस्तक तेच
असते जे लोकामध्ये वाटले जाते.”

समाप्त